# मुद्रेचे व्याख्या - कार्ये

# (Definition & Functions of Money)

बी.ए. सेम ३ अर्थशास्त्र,

समष्टी अर्थशास्त्र

डॉ. सौ. पुष्पा सु. तायडे

# मुद्रेची व्याख्या, स्वरूप व कार्ये :

निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी मुद्रेच्या निरनिराळ्या व्याख्या केलेल्या आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येते.

## अ) वर्णनात्मक व्याख्या :

या श्रेणीत येणाऱ्या व्याख्या मुद्रा म्हणजे काय ते स्पष्ट करण्यापेक्षा मुद्रेच्या वैशिष्टयांवर भर देतात. प्रो. थॉमस सिजविक, हार्टले विदर्स इ. च्या व्याख्या या श्रेणीत येतात.

हार्टले विदर्सची व्याख्याः- मुद्रेचे कार्ये जी करते तिला मुद्रा म्हणतात.

## ब) वैधानिक व्याख्या :

या श्रेणीत येणाऱ्या व्याख्या मुद्रेच्या राज्य सिध्दांतावर State Theory of money आधारित आहेत. याचा अर्थ असा की मुद्रा प्रसारित करण्यामागे सरकारची शक्ती असते. सरकार ज्या वस्तुला मुद्रा म्हणून घोषित करते. त्या वस्तुला लोक मुद्रा म्हणून मान्य करतात.

हॉट्रे च्या मते ज्या वस्तूचा स्विकार सर्व लोक करतात तिला मुद्रा म्हणतात.

# मुद्रेची- कार्ये

- प्राथमिक कार्ये Primary Functions
- दुय्यम कार्ये Secondary Functions
- आकस्मिक कार्ये Contingent Functions

# प्राथमिक कार्ये

- विनिमय माध्यमाचे साधन
- मूल्यमापनाचे साधन

# दुय्यम कार्ये

- मूल्य संग्रहणाचे साधन
- मूल्य हस्तांतरणाचे साधन
- विलंबित देणी देण्याचे साधन

# आकस्मिक कार्ये

- प्रत्ययाचा आधार
- राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप
- सीमांत उपयोगितेची समानता
- निर्णयाचा वाहक

# प्राथमिक कार्ये

- विनिमय माध्यमाचे साधन : मुद्रा विनिमयाच माध्यम म्हणून कार्य करते. याचा सोपा अर्थ असा की मुद्रा दोन व्यक्तिंच्या दरम्यान विनिमय म्हणजे देवघेव घडवून आणण्यासाठी माध्यम, मध्यस्थ म्हणून कार्य करते. पूर्वी जेव्हा मुद्रा अस्तित्वात नव्हती तेव्हा विनिमयाचे म्हणजे देवघेवीचे व्यवहार वस्तुच्या बदल्यात वस्तु देऊन होत असत. या अवस्थेला वस्तुविनिमयाची अवस्था असे म्हणतात.
- मूल्यमापनाचे साधन : मुद्रेच्या प्राथमिक कार्यातलं दुसरं साधन म्हणजे मूल्यमापन करणे. मुद्रेमुळे कोणत्याही वस्तूंचे मूल्यमापन करणे सहज शक्य झाले आहे. वस्तूविनिमयाच्या अवस्थेत वस्तूंचे मूल्य वस्तूत मोजले जात असे. त्यामुळे एका वस्तुच्या किती एकका बरोबर दुसऱ्या वस्तूचे किती हे लक्षात ठेवणे कठीण काम होते. मुद्रेमुळे वस्तुविनिमयातील ही अडचणही दुर झाली आहे. आता सर्व वस्तूंचे मुल्य एकाच वस्तूत म्हणजे मुद्रेत मोजले जाते. त्यामुळे मूल्यमापन सुलभ झाले आहे.

# दुय्यम कार्ये

- मूल्य संग्रहणाचं साधन : मुद्रेमुळे मूल्यसंग्रहण करता येणे शक्य झाले आहे. पूर्वी वस्तुविनिमयामध्ये मूल्यसंग्रहण करणे एक कठीण काम होते. कारण असंख्य वस्तूंचा वापर मुद्रेसारखा केला जात होता. त्यापैकी बऱ्याचशा वस्तु नाशिवंत स्वरूपाच्या होत्या उदा. अंडे, फुले, फळे इ. अशा नाशवंत वस्तूंचा संग्रह करता येत नसे.
- मूल्य हस्तांतरणाचं साधन : मुद्रेमुळे मूल्यहस्तांतरण सुलभ झाले आहे. वस्तुविनिमयाच्या काळात मूल्य हस्तांतरणात धोका होता. मुद्रेने वस्तुविनीमयातील अडचण दूर केली आहे. आज विनिमयाचे व्यवहार व्यापक स्वरूपाचे झाले आहेत. ते केवळ देशापुरतेच सीमीत राहिलेले नसून आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे झालेले आहेत. त्यामुळे आर्थिक जीवनाला गतिशिलता आली आहे. अधिकोषणाचा विकास व विस्तार झाल्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठविणे सहज शक्य झाले आहे. अशा प्रकारे मुद्रा ही मूल्य हस्तांतरणाचं साधन आहे.
- विलंबित देणी देण्याचं साधनः विलंबित देणी देणे म्हणजे रोखीचे व्यवहार न करता वायद्याचे व्यवहार करणे होय. याचा अर्थ असा की व्यवहार आज केला जातो. व शोधन ठरलेल्या कालावधीनंतर केले जाते. वस्तुविनिमयात असे व्यवहार करण्यात अनेक अडचणी होत्या. परंतु आज मुद्रेमुळे ही अडचण दूर झाली आहे. मुद्रेचे मूल्य दीर्घकाळपर्यंत स्थिर राहात असल्यामुळे वायद्याचे व्यवहार करणे सहज शक्य झाले आहे. म्हणून मुद्रा ही विलंबित देणी देण्याचं साधन मानलं जाते.

# आकस्मिक कार्ये

- प्रत्ययाचा आधार : मुद्रा प्रत्ययाचा आधार मानली जाते. व्यापारी बँका प्रत्ययाची निर्मिती करतात. म्हणजे ठेवीतून ऋणाची निर्मिती करतात तसेच ऋणातून ठेवीची निर्मिती करतात. या ठेवी मुद्रेच्या स्वरूपात स्विकारल्या जातात. म्हणून मुद्रा ही प्रत्ययाचा आधार मानली जाते. खालील उदाहरणाद्वारे मुद्रा प्रत्ययाचा आधार कशी आहे ते समजावून सांगता येते.
- राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटपः आजच्या काळात उत्पादन उत्पादक घटकांच्या संयुक्त प्रयत्नाने होते. एका विशिष्ट कालखंडात उत्पादनाची साधने जे उत्पादन करतात. ते राष्ट्रीय उत्पन्न त्याचं वाटप म्हणजे उत्पादक साधनांना दिला जाणारा मोबादला. उदा. भूमीमालकाला खंड मिळतो. मुद्रेच्या स्वरूपात श्रमिकांना मजुरी मिळते मुद्रेच्या स्वरूपात, भांडवलदराला व्याज मिळते मुद्रेचया स्वरूपात संघटकाला नफा मिळतो तोही मुद्रेच्या स्वरूपात. म्हणून मुद्रा ही राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप करते असे म्हटले जाते.

# आकस्मिक कार्ये

- सीमांत उपयोगितेची समानताः प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनदिन जीवनात वस्तु खरेदी करताना कळत न कळत त्या वस्तूसाठी द्यावी लागणारी किंमत व त्या वस्तूपासून मिळणारी सीमान्त उपयोगिता या दोन गोष्टींची तुलना करीत असतो. जर मिळणारी उपयोगिता जास्त असेल व द्यावी लागणारी किंमत कमी असेल व मिळणार उपयोगिता कमी असेल तर तो ती वस्तु खरेदी करण्यासा नकार देतात म्हणजे ज्या ठिकाणी मिळणार सीमांत उपयोगिता व द्यावी लागणारी किंमत समान होते. त्याठिकाणी त्याची खरेदी थांबते. अशाप्रकारे मुद्रेमुळे सीमांत उपयोगितेची समानता प्रस्थापित करता येते.
- निर्णयाचा वाहक : मुद्रा निर्णयाचा वाहक आहे. म्हणजे ज्याच्याजवळ मुद्रा आहे तो जसा निर्णय घेईल त्याप्रमाणे मुद्रा कार्य करते. उदा. समजा तुमच्या खिशात १०० रू. आहेत. तुम्ही आपल्या मित्राला पार्टी देण्याचे ठरवले. मुद्रा तुमच्या निर्णयाचं पालन करील. तुम्ही धार्मिक वृत्तीचे आहात म्हणून देवाच्या देव्हाऱ्यात १००रू. टाकून देवा, मला पास कर म्हटलं तरी मुद्रा तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागते. तुमची कोणी बहिण आहे तिला तुम्ही १००० रू. चे नेकलेस घेऊन दिलं तरी मुद्रा तुमच्या निर्णयाप्रमाणे वागते. त्यामुळे मुद्रेला स्वतःचं मन बुध्दी, भावना नसते. ती आपल्या मालकाच्या आज्ञेचे पालन करते म्हणूनच ती निर्णयाचा वाहक मानली जाते.